# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/सीआर नं.५/२०१६ — दिनांक:०४/०१/२०१७

वाचले:

१. मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र.मशा/आस्था/कार्या/इएसबी /कावि-१५१२/ २०१६, दिनांक २० डिसेंबर, २०१६.

२. या कार्यालयाकडील क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/सीआर नं.४४/२०१६ दिनांक :०५/०१/२०१६

---

**विषय** :- दिनांक ०१/०१/१९८२ ते दिनांक ०१/०१/२०१५ या कालावधीत कार्यरत असलेल्या अव्वल कारकुन संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंतरिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत

**ज्ञापन** :-

शासन, महसूल व वन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.०२५/इ-७, दिनांक ३१ जानेवारी, २०१४ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील नियम ३ (क) व ४ (१) मधील तरतुदीनुसार २१ जून, १९८२ ते १ जानेवारी, २०१५ अखेरचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-यांची जिल्हा पातळीवरील अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात आलेली आहे. नायब तहसिलदार संवर्गातील तदर्थ पदोन्नत्या नियमित करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त याद्यांची पडताळणी केली असता, त्यामध्ये सन १९९९ मध्ये व तदनंतर कार्यरत असलेल्या व अव्वल कारकून संवर्गातून पदोन्नत झालेल्या नायब तहसिलदारांची नावे सदर ज्येष्ठता सूचीतून वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. उपरोक्त कालावधीत कार्यरत असणा-या सर्व अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-यांची नावे सदरहू ज्येष्ठता सूचीमध्ये उचीत क्रमांकावर समाविष्ट केली असल्याची पुनश्च खातरजमा करुन दिनांक ०१.०१.२०१५ रोजीची अव्वल कारकून संवर्गाची ज्येष्ठता दर्शविणारी अंतरिम (तात्पुरती) ज्येष्ठता यादी प्रसिध्द करुन त्यावर सूचना व हरकती मागविण्यात करिता सदरची अतिम यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर यादी प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत त्यावर हरकत / सूचना दाखल करता येतील. सदर हरकती / सुचना कार्यालय प्रमूखांच्या अभिप्रायासह सादर कराव्यात. तसेच मुदतीनंतर आलेल्या हरकती / सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

सर्व कार्यालय/ शाखा प्रमूख यांनी सदरची अंतरिम ज्येष्ठता यादी त्यांचे अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या सर्व संबंधित अव्वल कारकून यांचे निदर्शनास आणावयाची आहे.

स्वाक्षरी/-
**(डॉ.महेंद्र कल्याणकर)**
**जिल्हाधिकारी ठाणे**

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- जिल्हाधिकारी पालघर

प्रत :- अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन, ठाणे

प्रत :- उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन उल्हासनगर

प्रत :- उपविभागीय अधिकारी, ठाणे / भिवंडी / कल्याण / उल्हासनगर / डहाणू / जव्हार / पालघर / वाडा / वसई

प्रत :- उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेंट्रो सेंटर ठाणे / सुर्या प्रकल्प डहाणू

प्रत :- तहसिलदार (सर्व)

प्रत :- शाखा प्रमूख (सर्व) जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

प्रत:- जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, ठाणे.

२/- सदर जेष्ठता यादी या कार्यालयाचे संकेतस्थळावर (www.thane.nic.in) प्रसिध्द करावी. सदर यादी संकेतस्थळावर १५ दिवस ठेवण्यात यावी.

**तहसिलदार(महसूल)**
**जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे**